
# अण्णा भाऊ साठे

## व्यक्ती, साहित्य आणि समीक्षा





संपादक

डॉ. राजकुमार मस्के

डॉ. लहू वाघमारे



Scanned with OKEN Scanner

# संपादक मंडळ

अतिथी संपादक

**यशवंत मनोहर**

संपादक

**डॉ. राजकुमार मस्के**

**डॉ. लहू वाघमारे**

सह संपादक

**डॉ. जयद्रथ जाधव**

**प्रा. अमोल पगार**

**डॉ. मारोती कसाब**

**डॉ. दुष्यंत कटारे**

कार्यकारी संपादक

**डॉ. चंद्रकांत वाघमारे**

**डॉ. नारायण कांबळे**

**संपादक मंडळ**

डॉ. गणेश चंदनशिवे
डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे
डॉ. सोमनाथ कदम
डॉ. ममता इंगोले
प्रा. नयन राजमाने
डॉ. पद्माकर पिटले
डॉ. संतोष हंकारे
डॉ. मारोती गायकवाड
डॉ. ओमशिवा लिगाडे
डॉ. सा. द. सोनसळे
डॉ. अरविंद कदम
प्रा. आरती गायकवाड
प्रा. रवींद्र बोरसे
डॉ. संजय कसाब
श्रीमती मधुबाला हुडगे
सौ. नीता मोरे

Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | लेख / लेखकाचे नाव | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| ६९ | अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयलेखनातील समाजजीवनाचे दर्शन<br>प्रा. मधुबाला गंगाधरराव हुडगे | ४७३-४७९ |
| ७० | विद्रोही साहित्याचे जनक - अण्णा भाऊ साठे<br>प्रा. संजय बन्सीधरराव कसाब | ४८०-४८३ |
| ७१ | मराठी साहित्यातील विद्रोही लेखक - अण्णा भाऊ साठे<br>डॉ. वनमाला लोंढे | ४८४-४८८ |
| ७२ | अण्णा भाऊंच्या कथेतील नायक-नायिका<br>प्रा. बापू कांबळे | ४८९-४९७ |
| ७३ | 'फकिरा' कादंबरी : एक आकलन<br>डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे | ४९८-५०१ |
| ७४ | भटक्या-विस्थापित समाजाचे चित्रण करणारी कादंबरी : 'माकडीचा माळ'<br>डॉ. मारोती कोल्हे | ५०२-५०७ |
| ७५ | अण्णा भाऊ साठे : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व<br>डॉ. सूर्यकांत हरिश्चंद्र गित्ते | ५०८-५१४ |
| ७६ | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आर्थिक विषमता<br>प्रा. जितेंद्र पांडुरंगराव काळे | ५१५-५१८ |
| ७७ | अण्णा भाऊंचा पोवाडा : श्रमजीवी आणि राष्ट्रीय अस्मितेचा दस्तऐवज<br>डॉ. दिनकर वसंत कुटे | ५१९-५२८ |
| ७८ | लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यातील विद्रोह<br>प्रा. विद्या खंदारे-गोवंदे | ५२९-५३३ |
| ७९ | अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील विद्रोह<br>प्रा. सौ. व्ही. सी. बेटकर | ५३४-५३९ |
| ८० | अण्णा भाऊ साठे यांचे स्त्रीविषयक विचार<br>प्रा. अनिता विश्वनाथ चौधरी | ५४०-५४५ |
| ८१ | ''कडकडे डफावर थाप, तू शोषितांचा मायबाप...''<br>नीता मोहनराव मोरे | ५४६-५५२ |
| ८२ | अण्णा भाऊंच्या लिखाणातील अन्यायाविरुद्ध लढणारा दलित<br>गोविंद व्यंकटराव आदावळे | ५५३-५६० |

# अण्णा भाऊ साठे यांचे स्त्रीविषयक विचार

प्रा. अनिता विश्वनाथ चौधरी
जी. के. जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

भारतीय समाज हा हिंदुधर्माने व्यापलेला आहे. हे 'हिंदुराष्ट्र' आहे, अशी टिमकी आणि त्यांच्यामागे तुणतुणे वाजविणारे बहुजन समाजातील 'सुरते'ही आता मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतात. या सर्व 'सुरत्यां'च्या आया-बहिणींची अवस्था या हिंदू धर्माने कशी बदसूरत केली होती, त्याची आठवण आज त्यांना राहिलेली नाही. माणसाला मुके, बहिरे आणि आंधळे करून टाकणारा 'धर्म' असू शकतो... याबाबतीत हिंदू धर्म तर सर्व धर्मांत वरच्या श्रेणीत आहे.

वास्तविक, हिंदू धर्म हा माणसांचा धर्म नाही. या धर्माने बहुसंख्येने असणाऱ्या शूद्र वर्णाला आणि एकूण समाजात निम्म्याने असणाऱ्या स्त्रीवर्गाला अगदी पशूपेक्षाही कनिष्ठ स्थान दिले. माणूसकीच्या हक्कांपासून वंचित ठेवले. 'मनुस्मृती' नावाचा कायदा करून स्त्री-शूद्रातिशूद्रांना कायमचेच कैदी बनविले. स्त्रियांनी आपल्या कुटुंबातील सर्वांची सेवा करावी आणि शूद्रांनी त्रैवर्णिकांतील सर्वांची सेवा करावी, हाच स्त्री-शूद्रांचा धर्म, असे हिंदू धर्माने सांगून टाकले. हे सर्व भेद आणि चातुर्वर्ण्य मीच केलेत, असे कृष्णकारस्थान करण्यात पटाईत असणाऱ्या कृष्णदेवाने सांगून सर्वांनाच गप्प केले. सर्वांची वाचा बंद करून टाकली या हिंदू धर्मसमर्थकांनी आणि धर्मग्रंथांनी.

या अतिकर्मठ हिंदू धर्माला शांततेच्या मार्गाने पहिला सवाल विचारला बुद्धाने... पण, या हिंदुत्त्वाची शेपटी वाकडीच राहिली... मग मात्र महात्मा फुले 'आसूड' घेऊन उभे राहिले. नुसते उभेच राहिले नाहीत, तर फुल्यांनी चक्क फटकारले हिंदु व्यवस्थेला... ज्योतिबांनी अक्षरशः हिन्दू धर्मव्यवस्थेला बोडके केले... ज्यामुळे स्त्री-शूद्रांच्या स्वातंत्र्यलढ्याचे रणशिंग फुंकले... पुढे फुल्यांचे पट्टशिष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर या 'मूकबधीर' जनतेचे नायक झाले. महात्मा फुल्यांनी सुरू केलेल्या स्त्री-शूद्रांच्या स्वातंत्र्याची लढाई पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली जिंकली गेली. हिंदुधर्मातील मनुचा कायदा जाळून आंबेडकरांनी नवा

कायदा केला. तो केवळ कायदाच नव्हता, तर स्त्री-शूद्रांच्या मुक्तीची सनद होती.

हिन्दू धर्म किंवा हिन्दू समाजव्यवस्थेने सर्वांसमोर स्त्रीची जी प्रतिमा निर्माण केली आहे, त्यामध्ये स्त्री ही स्वतंत्र नाही, तिला स्वातंत्र्य नाही. भारतीय स्त्रीचे दुसरे नाव 'पारतंत्र्य' आहे आणि अशी हिन्दू धर्मातील स्त्री आहे. डॉ. आ. ह. साळुंखे यांनी हिंदूधर्म आणि स्त्री या आपल्या ग्रंथात दाखवून दिले आहे. स्त्रियांचीसुद्धा वर्णामध्ये विभागणी आहेच. ब्राह्मण स्त्री, क्षत्रिय स्त्री, वैश्य स्त्री, शूद्र स्त्री... यांद्वारे पुन्हा तिची चिरफाड केली आहेच. पती हा स्त्रीचा परमेश्वर आहे, मग तो मूर्ख असो, नादान असो, व्यसनी असो... त्याचा स्त्रीने आदरच करावा. पतीपासून स्त्री विलग झाली, तर तिला स्वर्गप्राप्ती नाही. स्त्री घटस्फोट घेऊ शकत नाही. व्याभिचारी स्त्री मृत्यूनंतर कोल्हिणीच्या जन्माला जाते नि कुष्ठरोगाने पीडते. स्त्री ही मालमत्ता आहे, असे हिंदुधर्म कायदा मानतो. ब्राह्मणहत्या म्हणजे महापातक आणि स्त्रीहत्या म्हणजे उपपातक, यावरून स्त्रीविषयक हिंदुधर्माची भूमिका लक्षात येऊ शकते. चूल आणि मूल हेच स्त्रीचे वैभव आहे आणि तेच तिचे जीवन आहे.

ही आहे परंपरा... हिन्दूची, हिन्दू संस्कृतीची स्त्रियांना गुलाम करणारी, स्त्रीला शूद्र ठरविणारी आणि अशा या पारंपारिक हिन्दू समाजव्यवस्थेत जगत नव्हे, तर मरत असलेल्या स्त्रियांची बाजू अण्णा भाऊंनी घेतली. गुलामी, कनिष्ठत्त्व आणि अस्पृश्यत्त्व नाकारणारी अण्णा भाऊंची लेखणी मग स्त्री स्वातंत्र्याची जाहिरनामाच आपल्या कथा-कादंबऱ्यातून मांडला आहे.

हिन्दू धर्माचा कायदा मनुच्या इशाऱ्यावर हजारो वर्षे चालला आहे. काय सांगितले आहे हिन्दू धर्मग्रंथात? स्त्री आणि शूद्र समान आहेत आणि शूद्राला फक्त गृहस्थाश्रमच असतो. म्हणजेच ज्ञानार्जनासाठी असलेल्या ब्रह्मचर्याश्रम स्त्रियांसाठी नाही. म्हणजेच स्त्री शिक्षण घेऊ शकत नाही. स्त्रिया या प्रजननासाठीच असतात. स्त्री म्हणून जन्माला येणे, हेच मुळी तिच्या पूर्वजन्मातील कोणत्या तरी पापकृत्यामुळे घडलेले आहे. पुरुष हाच परिपूर्ण मानव आहे. स्त्रियांची तुलना मानवेत्तर प्राण्यांबरोबर नाही. स्त्रीने आपले घोटे (पाय) दिसू देऊ नयेत. स्त्रियांना स्वतंत्र यज्ञ नाही, श्राद्ध नाही, उपवास नाही. स्त्रीला धनाचा अधिकार नाही. स्त्रीला साक्ष देण्याचा अधिकार नाही. स्त्रीची हत्या ही फार गंभीर बाब नाही. मोक्ष हा हिन्दूचा सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ असून पुरुषांच्या दृष्टीने स्त्री ही मोक्षाच्या मार्गातील अडथळा आहे. स्त्रीला मोक्षाचा अधिकार नाही.

स्त्रियांचा स्वभाव उपजतच पापी आणि ना ना प्रकारच्या दुर्गुणांनी युक्त असतो. स्त्रियांच्या ओठात अमृत असते; पण हृदयात मात्र केवळ जालीम विषच

ISBN : 978-81-937477-0-4

असते. स्त्रिया अविश्वसनीय असतात. त्यांचा स्वभाव चंचल व अस्थिर असतो. स्त्रिया धूर्त असतात. स्त्रिया घातक असतात. स्त्रीच्या ठिकाणी शील वा चारित्र्य असूच शकत नाही. स्त्रियांपेक्षा अधिक पापी असे जगात दुसरे काहीही नाही. पुरुषाला स्त्रीची गरज आहे, ती यज्ञकर्म व पुत्रनिर्मिती व्हावी म्हणून. अन्यथा, स्त्रीची गरज नाही. स्त्री ही पापी पुरुषापेक्षा हीन आहे. म्हणजेच स्त्री 'माणूस' नाही... तिला कोणतेही अधिकार नाहीत. लहानपणी वडिलांवर, तरुणपणी नवऱ्यावर आणि वृद्धपणी स्त्रीने मुलांवर अवलंबून राहावे आणि पतिनिधनानंतर सती जावे. विधवा स्त्रीला तर हिन्दू धर्माने कमालाचे विद्रुप आणि कुरूप बनविले आहे आणि स्त्रियांची ही विटंबना चक्क हिन्दू धर्मशास्त्रकारांनी आणि हिन्दू धर्मग्रंथांनी केली आहे आणि अण्णा भाऊंनी हिन्दू धर्मातील ही सारी अक्षरे खोडून काढली आहेत.

अण्णा भाऊंची 'मंगला' ही आपल्या मनासारखाच जोडीदार हंबीररावाच्या रूपात स्वीकारते आणि धर्मबंधनांचे पारतंत्र्य नाकारले. ज्या धर्मग्रंथांनी स्त्रीच्या हातात पाळण्याची दोरी दिली. तिच्या हातात अण्णा भाऊंनी बंदूक दिली, ही एक क्रांतिकारी घटना आहे. पती हाच गुरू आणि पती हाच परमेश्वर मानायला लावणारी हिन्दू परंपरा ठोकरते आणि धनाजी रामोशाच्या घरात पत्नी म्हणून प्रवेश करते. बरबाद्याची निल्ली विधवा झाल्यानंतर स्वत:ला विद्रुप करून घेत नाही, उलट हैदऱ्याबरोबर निघून जाते. पतीच्या निधनानंतर अण्णा भाऊंची नायिका सती जात नाही, तर हिन्दू धर्मातील परंपरांचे दोर कचाकच तोडते. धर्मग्रंथांनी बांधलेले साखळदंडही फेकून देते नि नव्या जिद्दीने, आत्मविश्वासाने आणि सन्मानाने जगण्याची ईर्ष्या बाळगते. पतीने संशय घेतल्यावर घराबाहेर पडण्यापेक्षा, संशयखोर पतीच्या थोबाडीत मारणारी नायिका साहित्यात आणली. जिच्या शीलाला हिन्दू समाजात स्थान नाही, अशा स्त्रिया अण्णा भाऊंच्या साहित्यात आपल्या शीलासाठी, पावित्र्यासाठी जिवाची बाजी लावतात आणि आपले शील भ्रष्ट करणाऱ्याच्या डोक्यात देवळाच्या पायरीचा दगड घालतात.

अण्णा भाऊ ज्या स्त्रियांचे चित्रण आपल्या साहित्यातून करतात, त्या स्त्रिया उंच आलिशान गाडीतून येऊन चौपाटीवर फिरणाऱ्या नाहीत. आपल्या ओठाची लाली त्या प्रियकराला भेट देणाऱ्या नाहीत. मध्यरात्रीच्या पार्ट्यांना जाऊन व्हिस्कीचे घोट घेत, कुणाच्याही गळ्यात गळा घालणाऱ्या नाहीत. मायकेल जॅक्सनच्या ठेक्यावर ताल धरणाऱ्या, आपल्या कातडीचे प्रदर्शन करणाऱ्याही नाहीत. अण्णा भाऊंच्या नायिका झोपड्यात राहतात, शेतात राबतात, कष्ट करतात. दुसऱ्याचे सुख-दु:ख जाणतात. गाव, देश, पशू-पक्षी, फुले, फळे, वृक्ष-वेली, चिमणी-पाखरं, माणसं आणि माकडांवरही प्रेम करतात. आपल्या अब्रूला जपतात नि अब्रूचे रक्षण करता-करता



Scanned with OKEN Scanner

भरतात.

ना. सी. फडक्यांच्या नायिका अतिनाजूक, अतिदेखण्या, उच्चशिक्षित व सुखवस्तू आहेत. अण्णा भाऊंच्या नायिका पाटील, मांग, रामोशी, फरारी, दरोडेखोर, भटके, डोंबारी, कंजारी, कोल्हाटी यांच्या अडाणी कुटुंबातील आहेत.

एकूणच, स्त्रियांविषयी अण्णा भाऊंच्या अंत:करणात आदर आहे. बुद्धांच्या करुणेच्या डोळ्यांनी अण्णा भाऊ स्त्रीवर्गाकडे पाहतात. शीलाला जपणारी आणि शीलासाठी मरणारी स्त्री अण्णा भाऊंना महान वाटते. कोणत्याही किंमतीवर त्या आपले चारित्र्य सांभाळतात. अशा स्त्रियांचा अण्णा भाऊ सन्मान करतात. 'दु:ख' हा अण्णा भाऊंच्या लेखनाचा मुख्य विषय आहे; पण त्यातही स्त्रियांचे दु:ख ते आणखी वेगळेपणाने टिपतात. स्त्रियांना दु:ख देणाऱ्याला आणि दु:खी करणाऱ्याला जाळून मारण्याची तीव्र इच्छा त्यांना होते.

समता, स्वातंत्र्य ही मूल्ये घेऊन अण्णा भाऊ साहित्यात उतरले आहेत. त्यामुळेच स्त्री-पुरुष समतेचा ते पुरस्कार करतात. अण्णा भाऊंच्या साहित्यात चौफेर संचार करणारी ही स्त्री पूर्णपणे 'स्वतंत्र' आहे. स्त्री अबला नाही, उलट सबला आहे. आव्हानांना सामोरे जाण्याचे विलक्षण धैर्य अण्णा भाऊंच्या नायिका दाखवितात. नव्या स्वप्नांचा, नव्या विचारांचा आणि नव्या जीवनाचा ध्यास धरतात. जुनाट, प्रतिगामी हिन्दू धर्मप्रणीत विचारांना ठोकर मारून अण्णा भाऊंच्या नायिका नव्या पुरोगामी विचारांना कवटाळतात. त्यासाठी संघर्ष आणि बलिदान करण्याची त्यांची तयारी आहे. एकंदरीत, ज्या धर्माने स्त्रियांना गुलाम, शूद्र आणि अशुद्ध ठरविले, तो धर्म नि परंपरा अण्णा भाऊंच्या नायिका नाकारतात आणि हे सर्व करताना आपले चारित्र्यही जपतात, प्रायश्चितही घेतात.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या अनेक कथा-कादंबऱ्या स्त्रियांच्या जीवनप्रश्नाला समोर ठेवून लिहिल्या आहेत. त्यांची 'चित्रा', 'वैजयंता', 'आवडी', 'रत्ना', 'चंदन', 'डोळे मोडीत राधा चाले', 'चिखलातील कमळ', 'संघर्ष', 'रानगंगा', 'अलगुज' यांसारख्या कादंबऱ्या म्हणजे स्त्रीप्रधान कादंबऱ्या आहेत, तर स्त्रीप्रश्नाला समोर ठेवून अण्णा भाऊंनी अनेक कथाही लिहिल्या आहेत. 'गंगू', 'फुला', 'राणी', 'राधा', 'बिलवरी', 'निल्ली', 'मंकी', 'हौशी' अशा अनेक नायिकांना साहित्यदरबारात आणून अण्णा भाऊंनी स्त्रीमनाचे अनेक पदर उलगडले आहेत. अर्थात् हे सर्व लिहीत असताना, त्यातून अण्णा भाऊंचा स्त्रीविषयक दृष्टिकोन आणि विचार स्पष्टपणे पुढे येतो.

अण्णा भाऊंची 'मंगला' ही स्वातंत्र्यवेडी आहे. प्रेमभक्तीपेक्षा देशभक्ती



Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-937477-0-4

महत्त्वाची मानून, ती 'वारणेच्या खोऱ्यातल्या' हंबीररावला साथ करते नि त्याच्यासोबतच आपले जीवन संपवते. मंगला ही अण्णा भाऊंची नायिका स्वातंत्र्यचळवळीत भूमिगत राहून काम करणाऱ्या क्रांतिकारकाची प्रेयसी आहे. 'वैजयंती' ही तमाशात नाचणारी स्त्री आहे; पण ती अब्रुदार आहे. तशीच ती जिद्दी आहे. बलात्कार करण्यासाठी आलेल्या चांदुलालला ती न घाबरता सामोरी जाते. वैजंयता निर्भय आहे. ती चांदुलालसारख्यालाही ठोकरते आणि आपला प्रियकर असलेल्या उमाबरोबरच अखेरीस लग्न करते. एकूणच, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत 'वैजंयता' आपल्या आईच्या अपमानाचा बदला घेते, लढते आणि जिंकतेही. 'आवडी' ही लाडात वाढलेली तात्याबा चौगुल्याची मुलगी, नागू चौगुल्याची बहीण, तर भागवत पाटलाची सून आहे. आवडीचे लग्न तिला फसवून केले जाते. तिच्या पतीला फेफरे येत असते. आवडीला जेव्हा हे सर्व समजते, तेव्हा आपल्याला धोका झाला आहे, आपली फसवणूक केली आहे, या जाणिवेतून संतापते आणि घरंदाजपणाच्या बेड्या तोडून ती धनाजी रामोशाची पत्नी होण्यात धन्यता मानते. परंपरा मोडणारी एक स्वाभिमानी आणि क्रांतिकारी स्त्री अण्णा भाऊ येथे साकारतात. 'चंदन' ही झोपडपट्टीत राहणारी सुंदर; परंतु विधवा स्त्री आहे. आपल्या मुलांना जगवत असतानाच तीही वासनेने वरबटलेल्या नजरा चुकवत जगत असते. अनेक लोक तिच्या शीलावर घाला घालण्याचा प्रयत्न करतात; पण ती कोणाला दाद देत नाही. उलट तिच्यावर बलात्कार करायला आलेल्या दयारामच्या अंगावर ती ॲसिडचा डबा फेकते... एक लढाऊ, जिद्दी आणि शीलाला जपणारी चंदन अण्णा भाऊ दाखवितात. 'चिखलातील कमळ'मधील सीता ही खंडोबाला सोडलेली मुरळी आहे; पण तीही देव-धर्म नि परंपरा मोडून बळीशी लग्न करते.

थोडक्यात, अपमानाचा बदला घेणाऱ्या, शीलाला जपणाऱ्या, जिद्दी, धाडसी, निर्भय, स्वाभिमानी, करारी आणि देशभक्त स्त्रिया अण्णा भाऊ आपल्या साहित्यातून समोर आणतात. आपल्या मामाकडून उद्ध्वस्त झालेली सोना 'वेश्या' बनते; पण आपली बहीण चित्राला मात्र ती या व्यवसायात येऊ देत नाही. तिच्यासाठी ती संघर्ष करते. चित्राही स्वत: आपल्या चारित्र्यासाठी संघर्ष करते नि पळून जाते; पण चारित्र्य सांभाळते. चित्राचे शेवटी जयाबरोबर लग्न ठरते; पण आपली बहीण सोनाला चित्रा म्हणते, 'तुझ्या अब्रूची होळी करणाऱ्या जगाची होळी होईपर्यंत जग.' मला वाटते अण्णा भाऊंच्या स्त्रीविषयक विचारांचे हेच सार आहे. अण्णा भाऊ स्त्रियांविषयी म्हणतात, 'अब्रूला जपा, स्वाभिमानाने जगा, नीतिमत्तेने जगा, दुबळेपणाने राहू नका, परंपरेचे जोखड फेकून द्या, स्वतंत्र व्हा, हरू नका, अब्रूला जपा नि अब्रू घेणाऱ्याला



Scanned with OKEN Scanner

जाळा...'

अण्णा भाऊंचा हा स्त्रीविषयक दृष्टिकोन मोलाचा नि महत्त्वाचा आहे. अण्णा भाऊ स्त्रियांना विकृत करीत नाहीत. अण्णा भाऊंची नायिका कष्ट करणारी, फाटकी, तुटकी, नाचणारी किंवा कुरूप असली, तरी स्वाभिमानाने आणि स्वातंत्र्याच्या प्रेरणेने पेटलेली असल्यामुळे ती अधिकच सुंदर भासते. अण्णा भाऊ भारतीय नारीला, आपल्या माय-बहिणीला विकृत, किळसवाणी रेखाटत नाहीत. अण्णा भाऊंची लेखणी भारतीय स्त्रीची लाज राखण्यासाठी आणि तिची शान वाढविण्यासाठी झिजते; परंतु आज असे दलित-ललित लेखक आहेत की, ज्यांनी आपल्या समाजातील माय-बहिणींची अब्रू अक्षरश: वेशीवर टांगली आहे.

नामदेव कांबळेंची नायिका आणि नायक एवढे भ्याड आणि अब्रूची रक्षा न करणारे कसे असतात? उलट, अण्णा भाऊंच्या नायिका आपल्या अब्रूला हात घालणाऱ्याच्या तोंडावर ॲसिड फेकतात, अशा नराधमांच्या डोक्यात दगड घालतात. एवढेच नाही, तर त्याला जिवंत जाळतात... पण स्वत: जळत नाहीत, कुढत नाहीत, रडत किंवा सडत नाहीत.... अण्णा भाऊंचे नायक स्त्रीच्या पदराला धरणाऱ्यांचा हात तोडतात.

वास्तविक, जे लेखक आपल्या जातीची, आईची, बहिणीची इज्जत अशी जगजाहीर करतात... असे लेखकच प्रस्थापितांकडून सन्मानित होतात... हे समजून घेतले पाहिजे. 'वास्तववादी' लेखनाच्या नावावर विकृत लिहिणे, समाजाला, माणसांना कुरूप करणे, हे अण्णा भाऊंना मान्य नव्हते. उलट 'स्त्रीचा सन्मान झाला पाहिजे' हाच त्यांचा दृष्टिकोन होता नि त्याच पद्धतीने लेखन अण्णा भाऊंनी केलेले दिसते.

थोडक्यात, अत्यंत स्वाभिमानी, करारी, जिद्दी, बंडखोर, लढाऊ, प्रेमळ, कष्टाळू, निर्भय आणि तितक्याच देशभक्त अशा नायिका अण्णा भाऊंनी साहित्यात आणल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'हिंदू कोड बील' भारतीय संसदेत जरी नामंजूर करण्यात आले असले, तरी अण्णा भाऊंनी मात्र हे हिंदू कोड बील मान्य करून, ते आपल्या साहित्यात मंजूर करून टाकले. स्त्रियांकडे समतेने, ममतेने, न्यायाने आणि आदरतीने बघायला शिकविणारी दृष्टी अण्णा भाऊंच्या स्त्रीविषयक विचारांतून दिसते.